अत्यंत तातडीचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/१९१/२०२१
दिनांक :- १५ /०७/२०२१

माहितीचा अधिकार

विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत...

परिपत्रक

शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२५२/१५) सहा. दि.२८/०१/२०१६** अन्वये **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ मधील कलम ४(१)(क) मधील तरतुदींनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रितीने आणि स्वरुपात अभिलेखे सुचिबद्ध करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि त्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक असून अधिनियमातील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १ ते १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करुन ती प्रसिद्ध करणे अनिवार्य असलेबाबत कळविले होते.

तसेच, **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दरवर्षी किमान दोन वेळा आणि अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत सदर शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे होते. त्यानुसार मनपाच्या सर्व विभागांना वारंवार परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे. तरी देखील अनेक विभागांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)(ख) नुसार १ ते १७ बाबींची माहिती मनपा संगणक प्रणालीवर अद्ययावत न केलेबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

श्री.विशाल तुळशिराम मिठे यांनी दि.०२/०७/२०२१ रोजी मा.आयुक्त सो यांना व आपले सरकार ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे महाराष्ट्र शासनाकडे तक्रार दाखल केली असून मनपाचे अनेक विभाग १ ते १७ बाबींची माहिती मनपा संगणकप्रणालीवर अद्ययावत करत नाहीत तसेच, जे विभाग उपरोक्त माहिती मनपा संगणकप्रणालीवर अद्ययावत करणार नाहीत अशा विभागप्रमुखांवर शिस्तभंगाची कारवाई करणेत यावी अशा आशयाचे पत्र व तक्रार केली आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी व संबंधितांना अंतिमत: सूचित करण्यात येते की, अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ मधील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १ ते १७ बाबींवरील आपल्या विभागाची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि. २२/०७/२०२१ पर्यंत अद्ययावत करणेत यावी.

तसेच, दरवर्षी किमान दोन वेळा म्हणजेच दिनांक **१ जानेवारी व दिनांक १ जुलै** रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा व अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक व इतर कामकाज वाटपामुळे झालेल्या बदलांबाबतची माहिती वेळोवेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या

...२

Scanned with CamScanner

संकेतस्थळावर (www.pcmcindia.gov.in) अद्ययावत करावी. याबाबत तांत्रिक अडचणी उद्भवल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी तातडीने संपर्क साधून निराकरण करावे. सदर विषयाचे गांभिर्य लक्षात घेता उपरोक्त प्रमाणे दि. २२ /०७/२०२१ पर्यंत १ ते १७ बाबींची माहिती अद्ययावत न झाल्यास सदर विभागांची यादी मा.आयुक्त सो यांचे निदर्शनास आणून देण्यात येईल याच सर्व संबंधितांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

**तसेच, माहिती अधिकार व सेवा हमी कायदा याबाबतच्या वाढत्या तक्रारी व काही विभागांमार्फत सदर दोन्ही कायद्यांची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत नसलेने मा.आयुक्त सो यांचे मार्फत मनपाचे तपासणी पथक कार्यान्वित करण्यात येणार असून त्यांचेमार्फत मनपाच्या प्रत्येक विभागांची माहिती अधिकार व सेवा हमी कायद्याबाबतची तपासणी करणेत येणार आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

(निळकंठ पोमण)
**मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी तथा**
**नोडल अधिकारी, माहिती अधिकार**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,

-------------------------------------------- विभाग.

Scanned with CamScanner